# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः25.06.2024** **वारःमंगळवार**

---

1. 18 वी लोकसभा विकसित भारताच्या उभारणीसाठी काम करेल-पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. लोकसभा अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी
3. मुरलीधर मोहोळ, प्रतापराव जाधव, रक्षा खडसे या राज्यातल्या खासदारांनी घेतली मराठीतून शपथ
4. पुणे विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्यासाठी आवश्यक संयुक्त सर्वेक्षण करण्यास संरक्षण मंत्रालयाची मान्यता
5. बेकायदा पबवर कठोर कारवाईचे; तसंच अमली पदार्थांशी संबंधित अवैध बांधकामं पाडण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुण्याच्या पोलिस आयुक्तांना आदेश आणि
6. टी 20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत ऑस्ट्रेलियाला हरवत भारताची उपांत्य फेरीत धडक

**<u>संसद</u>**

18 वी लोकसभा विकसित भारताच्या उभारणीसाठी काम करेल, असं सांगून सरकार सर्वांना सोबत घेऊन लोकांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करेल, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल दिली. संसदेचं अधिवेशन सुरू होण्यापूर्वी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. सरकार चालवण्यासाठी बहुमताची गरज असते, मात्र देश चालवण्यासाठी सर्वांचं एकमत होणं महत्त्वाचं आहे, असं पंतप्रधान म्हणाले. प्रत्येकाला सोबत घेऊन राज्य घटनेचं पावित्र्य जपत देशहितासाठीचे निर्णय वेगाने घेऊन प्रगती साधण्याची आपल्या सरकारची इच्छा आहे, असं मोदी यांनी सांगितलं. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, प्रारंभी काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी हंगामी सभापती भर्तृहारी महताब यांना सभापतीपदाची शपथ दिली. त्यानंतर लोकसभेच्या कामकाजाच्या सुरुवातीला महताब यांनी नवनिर्वाचित खासदारांना खासदारपदाची शपथ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यानंतर केंद्रिय मंत्रीमंडळातील सर्व मंत्र्यांनी आणि त्यानंतर अन्य खासदारांनी शपथ घेतली. पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, जळगावच्या खासदार रक्षा खडसे यांनी मराठीतून शपथ घेतली. संसदेच्या नव्या इमारतीतील सभागृहात पहिल्यांदाच संसद अधिवेशन होत आहे. विरोधी पक्षांच्या इंडी आघाडीचे खासदार अधिवेशनाच्या कालच्या पहिल्याच दिवशी संसदेत राज्यघटनेच्या प्रती घेऊन आले होते.

**<u>गहूसाठा</u>**

गव्हाची साठेबाजी रोखण्यासाठी तसंच किमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारनं गव्हाच्या साठवणूकीवर मर्यादा घातल्या आहेत. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातले घाऊक, किरकोळ व्यापारी, साखळी पुरवठादार आणि प्रक्रिया उद्योग यांना ही साठवणूक मर्यादा लागू असेल. अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाचे सचिव संजीव चोप्रा यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहरांना ही माहिती दिली. गव्हाच्या साठ्याची कमाल मर्यादा घाऊक व्यापाऱ्यांसाठी 3 हजार टन, किरकोळ विक्रेत्यांसाठी 10 टन तर साखळी पुरवठादारांसाठी सर्व गोदामांमध्ये मिळून 3 हजार टन इतकी असेल. देशात गव्हाची उपलब्धता कमी असल्याचा वृत्ताचा चोप्रा यांनी इन्कार केला.

**<u>मुख्यमंत्री जलपर्यटन</u>**

राज्यातलं सरकार सर्वसामान्यांचं आणि शेतकऱ्यांचं सरकार आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेअंतर्गत केंद्राबरोबरच राज्य सरकारनंही शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान दिलं आहे, तसंच धानाला सातशे रुपये बोनस देत आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल सांगितलं. भंडारा जिल्ह्यात वैनगंगा नदीवरील जलपर्यटन आणि अन्य विकासकामांचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. भंडारा जिल्ह्याच्या वाढीव विकास आराखड्याला मंजूरी देण्यात येईल, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं.

**<u>पुणे विमानतळ</u>**

पुणे विमानतळाच्या धावपट्टीचा विस्तार करण्यासाठी आवश्यक असलेलं संयुक्त सर्वेक्षण करण्यास संरक्षण मंत्रालयानं मान्यता दिली आहे. केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी ही माहिती दिली. सध्याची धावपट्टी हवाई दलाच्या मालकीची असल्याने यासाठीचं पत्र मोहोळ यांनी नुकतंच संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना दिलं होतं. याबाबत मोहोळ यांची काल नवी दिल्लीत केंद्रीय संरक्षण सचिव आणि पुण्याच्या विभागीय आयुक्तांबरोबर संयुक्त बैठक झाली. त्यात या सर्वेक्षणाला मान्यता देण्यात आली.

**<u>पालखी सोहळा आढावा</u>**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचा सातारा जिल्ह्यातला प्रवास  उत्साहात, शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनानं सतर्क राहावं, अशा सूचना जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी दिल्या आहेत. पालखी सोहळा नियोजनाच्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. वारकऱ्यांना पुरवण्यात येणाऱ्या सर्व सुविधा दर्जेदार असाव्यात अशी सूचना त्यांनी केली. जिल्ह्यातल्या अतीवृष्टीची शक्यता असलेल्या आणि दरडप्रवण क्षेत्रात करायच्या उपायोजनांचाही देसाई यांनी आढावा घेतला.

**<u>पुणे ड्रग्ज</u>**

पुण्यातल्या अंमली पदार्थ प्रकरणी बेकायदेशीर पबवर कठोर कारवाई करण्याचे आणि अमली पदार्थांशी संबंधित अवैध बांधकामांवर बुलडोझर फिरवण्याचे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांना दूरध्वनी करुन मुख्यमंत्र्यांनी हे आदेश दिले. पुण्याला अमली पदार्थमुक्त शहर बनवण्यासाठी,  अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर नव्यानं कारवाई सुरू करावी, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. दरम्यान, या प्रकरणी उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई केली आहे. याप्रकरणी आतापर्यंत 9 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून 8 जणांना अटक करण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त संदीप गिल यांनी दिली आहे. व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या मुलांचा पुणे पोलीस शोध घेत आहेत; या मुलांनी जेवण आणि मद्यावर 80 ते 85 हजार रुपये खर्च केले; असं गिल यांनी सांगितलं. या प्रकरणी 40 ते 50 जणांची चौकशी केली जाईल. सूचना देऊनही लक्ष ठेवण्यात दिरंगाई केल्याबद्दल दोन पोलिस अधिकारी आणि दोन अंमलदारांवर कारवाई करण्यात आल्याची माहितीही संदीप गिल यांनी दिली. या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.

**<u>ग्राम पंचायतीत शिबिर- सिंधुदुर्ग</u>**

शासकीय अधिकारी जेव्हा संवेदनशीलतेनं काम करतात, त्यावेळी गोरगरीब जनतेची कामं लवकर होतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कुडाळचे तहसीलदार वीरसिंग वसावे यांनी याचं उदाहरणच घालून दिलं आहे. लाभार्थ्यांना आवश्यक असणारी केवायसी प्रमाणपत्रं पूर्ण करुन घेण्यासाठी ते थेट शेतकऱ्यांच्या शेतात पोहोचले. तसंच विद्यार्थ्यांना

आवश्यक असणारी प्रमाणपत्रं, दाखले मिळवून देण्यासाठी ग्राम पंचायतीत शिबिरं आयोजित केली. नागरिकांचं नुकसान होऊ नये म्हणून सुट्टीच्या दिवशीही काम करणाऱ्या वसावे यांच्या कामाविषयी जाणून घेऊया त्यांच्याचकडून.....

**पुणे हिट अँड रन**

पुणे पोर्शे कार अपघात प्रकरणातील मृत मुलांच्या पालकांनी काल मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या प्रकरणाचा खटला द्रुतगती न्यायालयात चालवून दोषींना लवकरात लवकर शिक्षा व्हावी यासाठी सरकार पूर्ण प्रयत्न करेल असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिलं. तसंच विशेष बाब म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मृत मुलांच्या कुटुंबियांना प्रत्येकी दहा लाख रुपये मदत देण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

**नीट घोटाळा-लातूर**

नीट परीक्षा गैरव्यवहार केल्याचा आरोप असलेल्या लातूरमधल्या एका आरोपीला न्यायालयानं 2 जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी सोलापूर आणि धारशिव जिल्ह्यातल्या आरोपींना लातूर पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्यांची चौकशी सुरू आहे.

**झिम्बाब्वे दौरा क्रिकेट संघ**

भारतीय क्रिकेट संघाच्या आगामी झिम्बाब्वे दौऱ्यासाठी भारतीय संघ काल जाहीर करण्यात आला. पाच सामन्यांच्या टी 20 मालिकेसाठी शुभमन गिल भारतीय संघाचा कर्णधार असेल. येत्या 6 ते 14 जुलैदरम्यान हे सामने खेळले जाणार आहेत. अभिषेक, नितीश रेड्डी, रियान आणि तुषार यांना संघात पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय सामन्यात खेळण्याची संधी मिळणार आहे. यष्टीरक्षक म्हणून ध्रुव जुरेल याची निवड करण्यात आली आहे.

**टी 20**

टी 20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल भारतानं ऑस्ट्रेलियावर 24 धावांनी मात करत स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. गयाना इथं काल झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारतानं 205 धावा केल्या. कर्णधार रोहित शर्मानं 41 चेंडूत 92 धावांची धडाकेबाज खेळी केली. त्यानं धावांचं अर्धशतक केवळ 19 चेंडूत पूर्ण केलं. भारताने दिलेलं 206 धावांचं लक्ष्य गाठताना ऑस्ट्रेलियाचा संघ 7 गडी बाद 181 धावाच करु शकला. भारतीय गोलंदाजांनीही सामन्यात चमकदार कामगिरी केली. अर्शदीप सिंगने 37 धावांमध्ये तीन गडी तर कुलदीप यादव ने 24 धावांच्या मोबदल्यात दोन गडी बाद केले.

**हवामान**

उद्या सकाळपर्यंतच्या हवामानाच्या अंदाजानुसार, राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पावसाचा अंदाज आहे. कोकणात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता असून किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहतील, असं हवामान विभागानं म्हटलं आहे. मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातही तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांसह जोरदार पावसाचा अंदाज असून मराठवाड्यातही काही ठिकाणी पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**